**महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ - शासन सेवेत सरळसेवेने नियुक्तीच्या पदावर रुजू होण्याचा विहित कालावधी.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही -२०१८ /व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

तारीख: २८ मे, २०१८

वाचा -

1) **महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ , दिनांक २१ जून १९८२**
2) **महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) (सुधारणा)नियमावली, १९८८, दिनांक २३ सप्टेंबर १९८८**

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र नागरी सेवा(ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२, मधील नियम ४(२) (अ) नुसार सरळसेवेने नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांनी, त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत नियुक्तीच्या पदावर रुजू होणे आवश्यक आहे. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याने स्वविवेकानुसार नियुक्ती स्विकारण्यास किती कालावधीपर्यंत मुदतवाढ दयावी याचा स्पष्ट उल्लेख महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मध्ये नाही. त्यामुळे काही प्रकरणी उमेदवारांना त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव १-२ वर्षे मुदतवाढ प्रशासकीय विभागांकडून दिली जाते तर काही प्रकरणी, उमेदवार रुजू होत नाहीत वा सक्षम प्राधिकाऱ्याकडे रुजू होण्यासाठी मुदतवाढीचा अर्ज करीत नाहीत. परिणामी शासनाची पदे दीर्घ काळ रिक्त राहतात त्याचा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होतो. यासंदर्भात सुस्पष्ट आदेश/सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने, या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) आयोगाकडून/निवडमंडळांकडून सरळसेवेने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्त्या देताना, महाराष्ट्र नागरी सेवा(ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२, मधील नियम ४(२)(अ) नुसार त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत रुजू होण्याची तरतूद आहे. त्यानुसार पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत रुजू होण्याचा कालावधी देण्यात यावा. सदर विहित कालावधीत उमेदवार रुजू झाला नाही तर तो नोकरीची संधी गमावेल व त्याचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा /विनंतीचा विचार केला जाणार नाही असा स्पष्ट उल्लेख नियुक्ती आदेशात करण्यात यावा.

२) उपरोक्त ३० दिवसांचा विहित कालावधी संपल्यानंतर, अपवादात्मक परिस्थितीत,रुजू होण्यास मुदतवाढ दयावयाची झाल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२, मधील

नियम ४(२)(अ) नुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना संबंधित उमेदवारास स्वविवेकानुसार रुजू होण्यास केवळ एक महिन्याचा वाढीव कालावधी देता येईल. तदनंतर उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा /विनंतीचा विचार करण्यात येऊ नये.

३) वरील प्रमाणे मुदतवाढ दिल्यानंतरही संबंधित उमेदवार रुजू न झाल्यास, संबंधित उमेदवारांचे नियुक्ती आदेश रद्द करावेत व अशा रिक्त पदांवर गुणानुक्रमे प्रतिक्षायादीतील अन्य उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी विचार करावा. मात्र, प्रतिक्षायादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्याचा निर्णय घेतल्यास, अशा उमेदवारांची ज्या आदेशान्वये नियुक्ती होईल त्या आदेशानुसार ते ज्या दिनांकास रुजू होतील त्या दिनांकास त्यांची ज्येष्ठता निर्धारीत केली जाईल. त्यांना मूळ गुणवत्ता यादीनुसार ज्येष्ठतेचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत. त्याप्रमाणे प्रतिक्षायादीतील उमेदवारांच्या नियुक्ती आदेशात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णयातील ज्येष्ठतेच्या तरतूदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा(ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मध्ये यथावकाश सुधारणा करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२९१३००१९३२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2018.05.29 13:03:01 +05'30'

( गीता कुलकर्णी )
**उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१४. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
१५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
१६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१७. निवड नस्ती.